दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com
● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शुक्रवार दि.११ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २२५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये
● Beed (Mahmar) Daily Marathi ● Friday 11 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 225 ● Pages 4 ● Rate 4 Rs


प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

## मराठी भाषिकांसाठी आनंदाची बातमी

# केंद्रीय गृह मंत्रालय मराठीतून आलेल्या पत्रांना आता मराठी भाषेतूनच उत्तर देणार

### संसदीय राजभाषा समितीच्या बैठकीत निर्णय; राज्यातील महायुती सरकारला देखील दिलासा

मुंबई (वृत्तसंस्था)–महाराष्ट्रातील राजकारण सध्या मराठी विरुद्ध हिंदी या मुद्द्यावरून तापलेले आहे. या दरम्यान केंद्रीय गृह मंत्रालयाने एक मोठा निर्णय घेतला आहे. केंद्रीय गृह मंत्रालय मराठीतून आलेल्या पत्रांना आता मराठी भाषेतूनच उत्तर देण्यात येणार आहे. संसदीय राजभाषा समितीच्या बैठकीत समितीचे नियंत्रक खासदार डॉ. दिनेश शर्मा यांनी ही माहिती दिली. केंद्रीय गृह मंत्रालयाने जाहीर केलेला हा निर्णय महाराष्ट्रातील मराठी माणसासाठी आनंदाचा मानला जात आहे.राजभाषा समिती देशातील प्रादेशिक भाषांना चालना देण्याचे काम करते. हिंदी भाषेला सहयोगी भाषा म्हणून इतर भाषांना प्रस्थापित करणे यासाठी या समितीचे प्रयत्न असतात. सध्या गृह मंत्रालयातील संपूर्ण कामकाज हे हिंदी भाषेमध्ये होत आहे. त्यातच आता मराठी भाषेतील पत्रांना मराठी भाषेतूनच उत्तर देण्यात येईल, तसेच तामिळ भाषेतील पत्रांना देखील तामिळ मधूनच उत्तर देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे डॉ. दिनेश शर्मा यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.






### राज्यातील महायुती सरकारला देखील दिलासा

राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारला मराठी विरुद्ध हिंदी या मुद्द्यावरून घेरण्याचा प्रयत्न विरोधक करत आहेत. यातच आता केंद्रीय गृह मंत्रालयाच्या या निर्णयामुळे महायुती सरकारला देखील मोठा दिलासा मिळाला असल्याचे मानले जात आहे. फडणवीस सरकार हे मराठी भाषा विरोधी असल्याचा दाखवण्याचा प्रयत्न विरोधक करत असताना केंद्रीय गृह मंत्रालयाने हा निर्णय जाहीर केल्याने आता सरकारमधील नेत्यांना मराठीच्या मुद्द्यावर आणखी एक विषय मिळाला आहे.

### समस्त मराठी भाषिकांसाठी ही अतिशय आनंदाची बातमी–चंद्रशेखर बावनकुळे

या संदर्भात भारतीय जनता पक्षाचे नेते मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आनंद व्यक्त केला आहे. समस्त मराठी भाषिकांसाठी ही अतिशय आनंदाची बातमी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या संदर्भात आपल्या पोस्टमध्ये त्यांनी लिहिले की, 'समस्त मराठी भाषिकांसाठी अतिशय आनंदाची बातमी आहे की, मराठी पत्रांना मराठीतच उत्तर देण्याचा अतिशय महत्वपूर्ण निर्णय केंद्रीय गृहमंत्रालयाच्या वतीने घेण्यात आला आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा घोषित करून पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने माय मराठीचा अगोदरच गौरव केला आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या कामकाजात करण्यात येणाऱ्या या क्रांतिकारी बदलाचा प्रत्येक मराठी भाषिक आनंदाने स्वागत करतो आहे. पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी जी व केंद्रीय गृहमंत्री आदरणीय अमित शहा भाई यांचे मन:पूर्वक आभार!'

# पवनराजे इंग्लिश स्कूल, केज येथे गुरुपोर्णिमा उत्साहात साजरी

**केज । प्रतिनिधी**

पवनराजे इंग्लिश स्कूल, केज येथे गुरुपोर्णिमेचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात व पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. सकाळी झालेल्या परिपाठानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष खंडेराव चौरे व प्रिन्सींपल अशोक मस्के सर हे होते. विद्यार्थ्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन हार्दिक स्वागत केले. कार्यक्रमात युवराज मगर सर, घुले सर व दळवी मॅडम यांनी आपल्या मनोगतातून गुरुंच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनात गुरूचे स्थान, मार्गदर्शन व प्रेरणेचे मोल समजावून सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अजय भांगे सर यांनी अत्यंत प्रभावी पद्धतीने केले, तर आभार प्रदर्शन सिद्धार्थ शिनगारे सर यांनी मानले. गुरुपोर्णिमा म्हणजेच गुरुंसाठी समर्पणाचा दिवस या भावनेने विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून गुरुंबद्दलचा आदर आणि श्रद्धा स्पष्टपणे जाणवली. संपूर्ण कार्यक्रम उत्साही वातावरणात आणि भावनिक वातावरणात पार पडला. या प्रसंगी चौरे मॅडम, डि.एस. चौरे सर, पठाण सर, पारखे मॅडम, केदार मॅडम, जाधव मॅडम, टेकाळे मॅडम, अश्विनी मॅडम, मुळे मॅडम, प्राची मॅडम, संजना मॅडम , अक्षता मॅडम, प्रगती मॅडम , अमृता मॅडम , लक्ष्मी मॅडम, सानिया मॅडम, विशाल सर, राऊत सर, काळे सर यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या गाभाऱ्यास विड्याच्या पानांची सजावट

### श्रीक्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील प्रतिदेहु श्रीक्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम येथे गुरुपौर्णिमा हजारो भाविकांच्या उपस्थिती त मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली

गुरूवर्य महंत ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्यामार्गदर्शना खाली गुरूपोर्णिमेच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या निमित्ताने जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचा गाभारा हजारो विड्याच्या पानांनी सजवण्यात आला.संत तुकोबाराय पावनधाम येथे गुरु पौर्णिमेनिमित्त आलेल्या भक्तांनी संत तुकाराम महाराजांच्या दर्शना बरोबरच गुरूवर्य महंत ह.भ.प.महादेव महाराज बोराडे शास्त्री यांचे आशीर्वाद ही घेतले. याप्रसंगी महंत ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री यांची किर्तनसेवा



संपन्न झाली.पावनधाम येथे आलेल्या हजारो भाविकांच्या प्रसादाची व्यवस्था सौ.स्मिता चंद्रकांत लोमटे यांनी केली.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अमोल महाराज,अशोक महाराज,जनार्धन महाराज,सिरसट महाराज,प्रशांतमहाराज निगडे,गणेश महाराज भगत,शाम महाराज भिसे,गोविंद शिनगारे आणि सर्व स्वयंसेवकांनी प्रयत्न केले.आणि गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

# पत्रकार चंद्रकांतपाटील यांच्या घरी ब्रम्हकमळ फुलले,केली विधीवत पुजा



**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील पत्रकार चंद्रकांत पाटील यांच्या निवासस्थानी ब्रम्ह कमळ फुलले असुन त्याला दोन फुले आली होती.यावेळी चंद्रकांत पाटील व सौ.ज्योती पाटील यांनी तसेच श्री.दिगांबर जगताप व सौ.वर्षाताई जगताप यांनी विधीवत पूजन करून ब्रम्हकमळ देवाला अर्पण केले.ब्रम्ह कमळ हे रात्रीच्या वेळी उमलते त्यामुळे ब्रम्ह कमळाला फुले येण्याची प्रतीक्षा महिलांना असतेत्यामुळे ब्रम्ह कमळाला फुले आल्याचा आनंद महिला वर्गाला होतो. वर्षभरात केलेली जोपासना फळाला आल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येतो त्यामुळे ब्रम्ह कमळाला कळी आल्यावर फुले येण्याची प्रतीक्षा महिलांना असते.विधीवत पुजन करून हे ब्रम्ह कमळ देवाला अर्पण केले जाते.

# १३ पैकी १३ सदस्य सदस्यांचा दणदणीत विजय सावरगाव सोसायटीवर बदामराव पंडितांचे वर्चस्व

### अमरसिंह पंडितांच्या पॅनेलचा दारुण पराभव

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्याचे लक्ष लागलेल्या सावरगाव सेवा सहकारी सोसायटीच्या झालेल्या निवडणुकीत माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखालील महालक्ष्मी शेतकरी विकास पॅनलचे १३ पैकी १३ सदस्य दणदणीत मतांनी विजयी झाले असून, यात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विद्यमान आ विजयसिंह पंडित यांच्या पॅनलचा दारुण पराभव झाला आहे.

गेवराई तालुक्यातील सावरगाव सेवा सहकारी सोसायटीच्या तेरा सदस्यांसाठी दिनांक ९ जुलै २०२५ रोजी मतदान प्रक्रिया पूर्ण होऊन मतमोजणी झाली. या निवडणुकीत माजी राज्यमंत्री बदामराव



पंडित आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे माजी आमदार अमरसिंह पंडित तसेच विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखालील दोन पॅनल आमने-सामने आले होते. बदामराव पंडित यांच्या गटाचे नारायण जाधवर आणि माजी सरपंच सुरेश नागरे यांनी सोसायटीचे ताब्यात घेण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले. या निवडणुकीत महालक्ष्मी शेतकरी विकास पॅनलचे नंदूबाई नारायण जाधवर, सुदामती देविदास डोंगरे, रुस्तुम इंगोले, लक्ष्मण धनगर, श्रीराम डोंगरे, विष्णू डोंगरे, शहादेव जाधवर, विठ्ठल लांडे, रोहिदास वाघमारे, शिवाजी सानप, हरिभाऊ नागरगोजे, छबुराव मिसाळ आणि हरिदास खाडे हे सर्व १३ उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी झाले आहेत. विजय झालेल्या सर्व नवनिर्वाचित सदस्यांचे माझे राज्यमंत्रीपदामराव पंडित यांनी आपल्या निवासस्थानी जंगी स्वागत केले. विधानसभा निवडणुकीनंतर पहिल्यांदाच गेवराई विधानसभा मतदारसंघात झालेल्या सेवा सहकारी सोसायटीच्या निवडणुकीत बदामराव पंडित यांच्या पॅनलने विजय प्राप्त केल्याने येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत चांगलाच रंग भरणार हे स्पष्ट दिसत आहे.

संपादकीय

# जलामृत की विषामृत ?



वायू सजीव सृष्टीसाठी प्राण आहे तसेच जल हे सुद्धा मुख्य तत्त्व आहे. संस्कृतमध्ये आप म्हणजे पाणी. वेदांमध्ये पाण्याला दिव्य म्हटले जाते. जे शांती, आनंद, संपत्ती, दीर्घायुष्य आणि चांगले आरोग्य आणते असे मानले जाते. औषधी गुण तत्त्वांमुळे त्याला 'अमृत' म्हणतात. आपल्या यजुर्वेदामध्ये सुद्धा जल हे सर्व रोगांवरचे औषध दिले आहे.म्हणजे जलाची शुद्धता ही आरोग्यदायी जीवनासाठी आवश्यक आहे. पुराणानुसार पूजेचे साहित्य नद्यांमध्ये विसर्जन करणे, अस्थी विसर्जन करणे, पाण्यात थुंकणे, मूत्रविसर्जित करणे... हे सर्व जलाचा अपमान आणि पाप करण्यामध्ये येते. वैदिक परंपरेनुसार जलसंवर्धन करणे फार आवश्यक आहे. जल हे प्रत्येकाच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. परमेश्वराने या सजीव सृष्टीसाठी पालक म्हणून परिपूर्ण व्यवस्था केली आहे. पंचतत्त्वांव्यतिरिक्त वृक्ष–वनसंपत्ती सर्व काही दिले आहे. या अद्भुत शक्तीने आपल्यासाठी हे अमृतमय जल स्त्रोत नद्या, सागर, तलाव, झरे यातून सर्व घटकांपर्यंत पोहोचवले आहे. ऋतुचक्र योग्यरीत्या चालते, तेथून आपल्याला जल हे पावसाच्या माध्यमातून मिळते.युगानुयुगे मानवाच्या प्रवृत्तीत जसजसा बदल होत गेला तसतसे पर्यावरण कमकुवत होत चालले. सांडपाणी, औद्योगिक कचरा, शेतीतील रसायने, प्लास्टिक, तेल गळती अशी जलप्रदूषणाची प्रमुख कारणे आहेत. मूळ औद्योगिक क्रांतीमुळे आपण जल विषमय करत आहोत. जल प्रदूषण अनेक कारणांमुळे होते, ज्यात नैसर्गिक आणि मानवनिर्मित घटक समाविष्ट आहेत.जगात १,५०,००० पेक्षा जास्त नद्या आहेत. नाईल, मेझॉन, मिसिसिपी, यांगत्झी सारख्या प्रमुख नद्या आहेत. भारतात जवळजवळ ४०० पेक्षा अधिक नद्या होत्या त्यातील प्रमुख १२ नद्या आहेत. यातील ब्रह्मपुत्र, गंगा, नर्मदा, सरस्वती, इंडस, ओहायो, मेघना, युना अशा अनेक नद्या आता आटल्या आहेत. या नद्या आटण्याचे मुख्य कारण म्हणजे धरणे आणि अनेक पर्यावरण हानिपूरक योजना. महाराष्ट्रातील ५५ नद्या या सर्वाधिक प्रदूषित असून भारतातील दिल्ली जवळील यमुना, पाकिस्तानातील रावी आणि इतर देशातील नैरोबी, थेम्स, पाझ, नायजर आणि नाईल, येलो, आर्टेमिस, अशा अनेक नद्या आहेत. प्रशांत, अटलांटिक, दक्षिणी, आर्कटिक, हिंद हे प्रमुख पाच महासागर आहेत. शिवाय अजून पन्नास समुद्र सुद्धा आहेत. आपण समुद्र सुद्धा प्रदूषित करत आहोत. प्लास्टिक, औद्योगिक नद्यांमधील कचरा समुद्रात सोडून दिल्यामुळे समुद्राच्या गुणवत्तेला नुकसान झाले आहे.ज्याचा परिणाम मानवी आणि जलचर आरोग्यावर होत आहे. जगामध्ये कचरा आणि सांडपाणी यामुळे सर्व नद्यातील परिसंस्थेचा नाश झाला आहे. नद्या, समुद्र या सर्वाचे जल हे प्रदूषित झाल्यामुळे पर्यावरणीयदृष्ट्या खालचे पात्र हे मृत झाले आहे म्हणजेच ऑक्सिजनची पातळी ही २० टक्क्यानी कमी झाली आहे. औद्योगिक क्रियाकलापांमुळे येथील जीव जीवाणूंसाठी असणारे पोषक घटक तत्त्व (सशक्त गाळ) विषारी झाल्यामुळे येथील जीवसृष्टी नामशेष होत चालली आहे. समुद्रातील ध्वनी उदाहरणार्थ तेल ड्रिलिंग, समुद्री परिवहन, समुद्रावर टाकण्यात येणारी प्रकाश योजना ज्यामुळे प्राकृतिक घटकांना त्यांच्या जीवनचर्येत बाधा उत्पन्न करत असून उष्णता वाढल्यामुळे येथील समुद्री जीवांना गंभीर नुकसान होत आहे. या जलप्रदूषणामुळे आमांश, अतिसार हेपेटाइटिस ए, कॉलरा, टायफॉइड, पोलिओ, प्रजनन संस्थेवर परिणाम, कर्करोग आणि घातक रासायनिक द्रव्यांमुळे शरीरातील इतर अवयवांवर होणारे परिणाम अशा अनेक गंभीर आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागत आहे.आता जगभरात साधारणत: २५% लोकसंख्येला सुद्धा पिण्याचे शुद्ध पाणी मिळू शकत नाही. पाण्याच्या शुद्धीकरणासाठी क्लोरीनचा वापर करावा लागतो पण महत्त्वाचे म्हणजे क्लोरीनमुळे जंतू मरतच नाही. थक्ज नुसार जगभरात कमीत कमी दोन अब्ज लोक हे प्रदूषित जल पितात, तर दिवसातून फक्त अतिसारामुळेच अंदाजे १००० मुलांचा तरी मृत्यू होतो. माझ्या मते या सजीव सृष्टीतील अनेक घटक या प्रदूषणामुळे नामशेष झाले आहेत, ज्याची आपण मोजणी करू शकतच नाही आणि मानवाची सुद्धा. १९७४ मध्ये वॉटर क्ट स्थापित केला होता त्यानुसार अनेक मंडळांची स्थापना करून कडक कायदे जलप्रदूषण करणाऱ्यांवर आणि जल प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण यावर केले गेले. १९८८ मध्ये पर्यावरण संरक्षणासाठी यात अजून सुधारणा करण्यात आली. प्रदूषणामुळे सुरुवात तर ऋतुचक्र बदलाने झालीच आहे, पण भवितव्यात सजीव सृष्टीसाठी असणाऱ्या गरजाचं काय? बदलणारा निसर्ग आपल्याला सारखा सावध करतोय.भविष्यात सांगितल्याप्रमाणे तिसरे महायुद्ध झाल्यानंतर सुरुवात ही जल संकटाने होणार आहे. ऋतुचक्र–वनस्पती ते सर्व सजीव, निर्जीव घटक या सर्वांसाठी जल ही संजीवनी आहे; परंतु मानवाने त्याच्या क्रूर आणि घातकीपणामुळे या जलदेवतेला विषमय करून टाकले आणि ही संजीवनी मृत्यून्त झाली. चारही बाजूंनी समुद्राने घेरलेल्या मुंबईसारख्या बेटाला सुद्धा या जल प्रदूषणाचा फटका जोरदार बसणार आहे. कारण आपण पराकोटीचे प्रदूषण करत आहोतच; परंतु समुद्राला आत ढकलण्याचा जो काही विडा उचलला आहे त्यात एक दिवस हा समुद्र या बेटाला गिळंकृत करेल. निसर्गातील प्रत्येक घटक हा विचारपूर्वक आणि संतुलित केला गेला आहे. त्यात ढवळाढवळ केल्यास प्रकृती कधीही सहन करणार नाही. या मानवी क्रुरकर्मामुळे या सजीव सृष्टीतील एकही घटक जिवंत राहू शकणार नाही. कितीही प्रयत्न केला तरी अमृतमय जल विषमय होऊन जाईल आणि विष सुद्धा प्यायला मिळणार नाही !आता तरी या परिपूर्ण मानव घटकाने तिच्या संरक्षणात्मक कार्य करावे म्हणजे जलसंतुलन होऊ शकते आणि तरच ही जलदेवता तुम्हाला म्हणजे सर्व सजीव सृष्टीला कायम सुखमय आणि आनंदमय ठेवू शकते.

# कोकण रेल्वे स्थानकांवरील छताचे काम पूर्ण करा



कोकणातील रेल्वे सेवा सध्या जनतेची जीवनवाहिनी झाली आहे. कोकणात रेल्वे सुरू होऊन या वर्षी २७ वर्षे पूर्ण झाली. देशातील मुंबई व मंगळूरु या बंदरांना जोडणारा कोकण रेल्वे हा महत्त्वाचा मार्ग आहे. हल्लीकडे कोकणातील रेल्वे स्थानकांच्या दर्शनी भागांचे आणि प्रवेशद्वारांचे सुशोभीकरण करण्यात येत आहे. ही कोकण रेल्वेच्या दृष्टीने समाधानाची बाब असली तरी रेल्वे प्लॅटफॉर्मवर प्रवाशांना आसरा मिळण्यासाठी अजूनही छत अपुरे आहेत. या मार्गावरून जवळजवळ ३० प्रमुख रेल्वेगाड्या धावत आहेत. तेव्हा रेल्वे प्रवाशांच्या दृष्टीने रेल्वे स्थानकांवरील प्लॅटफॉर्मवर पूर्ण छत बांधण्यासाठी रेल्वे प्रशासनाला जागृत करण्यासाठी थोडक्यात घेतलेला वेध.

कोकण रेल्वेमार्गावरील मंगळूरु ते उडुपी दरम्यान पहिली रेल्वे २० मार्च १९९३ रोजी धावली होती. त्याआधी १५ सप्टेंबर १९९० रोजी रोहा येथे कोकण रेल्वेचा पायाभरणी समारंभ करण्यात आला. त्यानंतर अवघड असा वाटणारा कोकण रेल्वे मार्गाचे २६ जानेवारी १९९८ रोजी उद्घाटन होऊन रेल्वेसेवा सुरु करण्यात आली. याचे खरे श्रेय कोकणातील राजापूर लोकसभा मतदारसंघातून (आताचे रत्नागिरी–सिंधुदुर्ग मतदारसंघ) सलग पाच वेळा लोकसभा सदस्य म्हणून निवडून आलेले मधू दंडवते यांना जाते. त्यामुळे त्यांना कोकण रेल्वेचे शिल्पकार असे अभिमानाने लोक म्हणतात. यासाठी जवळ जवळ सत्तेचाळीस हजार कोकणातील कुटुंबीयांना विस्थापित व्हावे लागले होते. आता या मार्गावरून रेल्वे सुरु होऊन २७ वर्षे पूर्ण झाली असून रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्मवरील अपुऱ्या छतामुळे प्रवाशांचे खूप हाल होत आहेत. त्यात बसण्याची सुद्धा सोय नाही. मग सांगा वृद्ध व्यक्ती, अपंग व्यक्ती किंवा लहान मुले यांचे होणार कसे? त्यात यावर्षी मे महिन्यापासून पावसाला सुरुवात झाला आहे.

मी जेव्हा २३ मे रोजी मुंबईला येत होतो त्या दिवशी पाऊस होता. त्यामुळे छत्री असून सुद्धा माझ्याजवळ सामान असल्याने भिजत रेल्वे डब्यापर्यंत जावे लागले. बऱ्याच वेळा या मार्गावरील रेल्वे गाड्या उशिराने धावत असतात. अशावेळी छत असेल तर प्रवाशांचे हाल होणार नाहीत. प्रवासी थोडी विश्रांती घेऊ शकतात. लोक आपापल्या डब्याकडे जाऊन गाडीची वाट पाहू शकतात. त्यामुळे प्लॅटफॉर्मवर गर्दी सुद्धा होणार नाही.

अपुरे छत असल्यामुळे रेल्वे प्रवाशांचे खूप हाल होतात. तसेच गाडी आल्यावर प्रवाशांची धावाधाव होते. काही वेळा एकमेकांना आपटतात सुद्धा. बऱ्याच वेळा गाडी सुटेल म्हणून समोर असलेल्या डब्यात लोक चडतात. नंतर शोधत शोधत आपल्या डब्याकडे जातात. त्यावेळी त्या आसनावर वेगळीच व्यक्ती झोपलेली असते. त्याला उठवायला अर्धा तास जातो. त्यामुळे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागतो. इतकेच नव्हे तर १८ मे रोजी मुंबईला जाणारी दुपारी ३.०० ची रेल्वे गाडी रात्री १०.०० वाजता येण्याचे संकेत रेल्वेन प्रशासनाने दिले असताना सुद्धा ती रेल्वे गाडी रात्री १२.०० वाजता आली. तेव्हा जवळच्या प्रवाशांचे सोडा लांबच्या प्रवाशांचे काय हाल झाले असतील त्याची कल्पना न केलेली बरी. त्यात मुसळधार पाऊस. काही प्रवासी एका बाजूला आपले सामान ठेवून रेल्वे प्रशासनास मालवणीत समाचार घेत होते. अशावेळी प्लॅटफॉर्मवर छत असते तर प्रवाशांची हालत झाली नसती. अजूनही एकच रेल्वे मार्ग असल्याने क्रॉसिंग करताना सुद्धा वेळ जातो. याचा परिणाम लांब पल्ल्याच्या गाड्या उशिराने धावतात.

तेव्हा उन्हाळा, पावसाळा व हिवाळा असो रेल्वे स्टेशनवर गाडीच्या लांबीचे पूर्ण छत असले पाहिजे. शेवटी प्रवाशांचे सुख हेच रेल्वे प्रशासनाचे सुख असते. आपल्या भारतीय रेल्वेचे ब्रीदवाक्य देशाची जीवनवाहिनी असे आहे. जर आपण सर्वांनी भारतीय रेल्वेच्या ब्रीदवाक्याचा विचार केल्यास जी देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी आणि प्रवाशांच्या सेवेसाठी खूप महत्त्वाची आहे. महत्त्वाची बाब म्हणजे कोकण रेल्वे देशाच्या उत्पनाचे एक प्रभावी साधन मानले जाते. मागील दिवाळीला रेल्वेने ७७ दिवसांचा बोनस आपल्या सेवकांना जाहीर केला होता. यावरून तिचा कारभार किती जोरात चालला आहे याची कल्पना येते. कोकण विभागातील सुमारे ३६ रेल्वे स्थानकांच्या दर्शनी भागांचे आणि प्रवेशद्वारांचे सुशोभीकरण करण्यात येत आहे. याची सर्व जबाबदारी राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाने हाती घेतली आहे. काही ठिकाणी मुसळधार पावसामुळे नवीन बसवलेल्या छताला आणि क्लॅडिंगचे नुकसान झाले आहे. तसेच अनेक स्थानकांचे काम अपुरे आहे. पावसाचे पाणी आतमध्ये ठिबकत आहे. असे जरी असले तरी प्रथम प्रवाशांच्या सेवेसाठी रेल्वे आहे हे ओळखून सुशोभीकरणाबरोबर प्लॅटफॉर्मवरील छताचे काम पूर्ण झाले पाहिजे.आतापर्यंत २७ वर्षे कोकण रेल्वेला पूर्ण झाली. त्यात एक वर्ष गेले तर काय फरक पडणार आहे. तेव्हा कोकण रेल्वे मार्गावरील सर्व रेल्वे स्थानकावर पूर्ण छत होणे प्रवाशांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे. जर आपण कोकणातील रेल्वे स्थानकांच्या गरजांचा विचार करता प्रथम रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्मवर छत झाले पाहिजे. म्हणजे रेल्वे प्रवाशांचा मानसिक ताण कमी होईल. त्यामुळे रेल्वे प्लॅटफॉर्मवर रेल्वे गाडी आल्या आल्यास प्रवाशांना पळापळ करण्याची वेळ येणार नाही. तेव्हा रेल्वे प्रवाशांच्या हिताच्या दृष्टीने कोकण रेल्वे प्रशासनाने रेल्वे सुशोभीकरणाबरोबर रेल्वे प्लॅटफॉर्मवरील छत तातडीने बांधणे प्रवासी तसेच रेल्वे प्रशासनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे.

# लाडकी बहीण योजनेतील गैरफायदा चिंताजनक



लाडकी बहीण योजनेतील गैरफायदा चिंताजनक राज्य सरकार जनतेच्या भल्यासाठी अनेक योजना आणते. तळागाळातील लोकांना त्यांचा फायदा व्हावा हा त्यामागील हेतू असतो. पण, योजनेच्या माध्यमातून लाभार्थ्यांना जे पैसे मिळतात, ते जनतेकडून कररूपाने आलेल्या पैशांचा तो एक भाग असतो, हे कटूसत्य आहे. पण, हाच पैसा चुकीच्या लाभार्थ्यांच्या हाती पडला असे जेव्हा सरकारी करदात्यांना कळते, तेव्हा त्यांना नक्कीच दु:ख होत असेल. महाराष्ट्र सरकारने विधानसभा निवडणुकीच्या आधी लाडकी बहीण योजना ही महत्त्वाकांक्षी योजना आणलेली होती. ही योजना इतकी लोकप्रिय होती की, पुन्हा महायुतीचे सरकार सत्तेवर येण्यास योजना फायदेशीर ठरली असे राजकीय जाणकारांचे म्हणणे आहे. आता मात्र, या योजनेतील अपात्र संख्येवरून नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे. ११ लाख महिलांना या योजनेतून अपात्र ठरविण्यात आले आहे.

येत्या काही दिवसांत छाननीमध्ये ५० लाख महिला अपात्र ठरू शकतात, असा अंदाज बांधला जात आहे. एखाद्या सरकारी योजनेतून अपात्र होण्यासाठी एवढा मोठा लाखोंचा आकडा असू शकतो, ही योजना राबविणाऱ्या प्रशासनाची एक प्रकारे नामुष्की म्हणायला हरकत नाही; परंतु एखादी गोष्ट फुकट मिळत असेल, तर नैतिकता, समाजातील प्रतिष्ठा यांचा विचार न करता, सरकारी योजनेतील पैसे लाटण्याची प्रवृत्ती बरे नव्हे. ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांसाठी राज्य सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली होती. महायुती सरकारने लाडकी बहीण योजना १ जुलै २०२४ पासून अमलात आणली. योजनेचा मुख्य उद्देश महिलांना आर्थिक स्वातंत्र्य, आरोग्य आणि पोषण सुधारणा तसेच कुटुंबातील निर्णायक भूमिका मजबूत करणे ही होती. त्यासाठी २ कोटी ६३ लाख महिलांनी अर्ज केले होते. त्यापैकी २ कोटी ४१ लाख महिला पात्र ठरल्या होत्या. या पात्र ठरलेल्या महिलांना प्रत्येक महिन्याला दीड हजार रुपये मिळाले होते. जून महिना सुरू झाला तरी अजूनही लाभार्थी महिलांच्या खात्यामध्ये मे महिन्याचे पैसे जमा झालेले नाहीत. त्यामुळे मे महिन्याचा हप्ता बँक खात्यामध्ये कधी जमा होणार? याकडे आता लाडक्या बहिणींचे लक्ष लागले आहे.

१० जूनला वटपौर्णिमा आहे. वटपौर्णिमा हा सण महिलांसाठी महत्त्वाचा असतो. त्यामुळे वटपौर्णिमेच्या मुहूर्तावर लाडक्या बहिणींच्या बँक खात्यामध्ये मे महिन्याचे दीड हजार आणि जून महिन्याचे दीड हजार असे तीन हजार रुपये जमा केले जाऊ शकतात, अशी चर्चा आता सुरू झाली आहे. दुसऱ्या बाजूला राज्यभरातील लाखो महिलांनी या योजनेत अर्ज केले होते. त्या अर्जांची पडताळणी मोठ्या प्रमाणात सुरू आहे. यात अनेक महिला अपात्र असतानाही त्यांनी या योजनेचा लाभ घेतला ही बाब समोर आली होती. त्यामुळे अशा महिलांचे अर्ज बाद करण्यात येत आहेत. आतापर्यंत अडीच हजारांहून अधिक सरकारी कर्मचाऱ्यांनी गैरफायदा घेतल्याचे उघड झाले, ही धक्कादायक बाब आहे.

सरकारी कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही असे शासन निर्णयातच स्पष्ट करण्यात आले होते. तरीही महिला कर्मचाऱ्यांनी अर्ज भरले तसेच योजनेचा लाभही घेतला. यात वर्ग तीन आणि वर्ग चारच्या महिला कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. तक्रारीनंतर आणखी सहा लाख कर्मचाऱ्यांची अशाच पद्धतीने तपासणी केली जाणार आहे. शिपाई पदावर काम करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांचे वार्षिक उत्पन्न हे चार लाख रुपयांच्या वर असते. असे असताना, अडीच लाखांपेक्षा कमी उत्पन्न असलेला महिला या योजनेचा लाभ घेऊ शकते अशी अट असतानाही, अर्ज करण्याचे धाडस कसे केले या सरकारी महिलांनी? ज्या सरकारच्या पैशांवर रोजीरोटी चालते त्या सरकारशी अप्रामाणिक वागण्याचे काम संबंधित सरकारी महिलांनी केले आहे.उंच टॉवर्समध्ये राहणाऱ्या तसेच चारचाकी वाहन मालकीच्या असलेल्या महिलांनी गरीब महिला बनवून सरकारला फसविले आहे, हे सामाजिकदृष्ट्या अत्यंत क्लेशदायक आहे. तसेच, सुमारे ९ लाख महिलांनी नमो शेतकरी योजना आणि लाडकी बहीण या दोन्ही योजनांचा आर्थिक लाभ घेतल्याचे तपासात आढळून आले. त्यांनी लाडकी बहीण योजनेचे दीड हजार रुपये महिन्याकाठी घेतले आहेत. त्याचवेळी केंद्र व राज्य सरकारकडून नमो शेतकरी योजनेत प्रत्येकी बारा हजार रुपये घेतले. याचा अर्थ वर्षाकाठी त्यांना ३० हजार रुपये मिळाले आहेत.

लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून ज्यांना सरकार तिजोरीतून यापूर्वी दिलेले पैसे परत घेणार नसल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर केल्याने, आतापर्यंत जो पैसा लुटला गेला त्यावर आता पडदा पडला आहे. यापुढे नवीन हप्ते केवळ पात्र महिलांनाच मिळतील, असे सरकारने स्पष्ट केल्याने, येत्या काही दिवसांत गरजू, गरीब बहिणींचा निश्चित आकडा किती हे समोर येईलच. मात्र, सरकारने अन्य योजना राबविताना, लाभार्थ्यांची संपूर्ण पडताळणी केल्याशिवाय त्यांच्या खात्यावर पैसे वळते करू नये, ही सुद्धा सर्वसामान्य करदात्यांची भावना आहे. या योजनेतून अपात्र लाभार्थ्यांचा लाखो संख्येचा आकडा हा चिंताजनक असला तरी, दुसरी योजना राबविताना प्रशासनाने खबरदारी घ्यावी, एवढी माफक अपेक्षा करायला हरकत नाही.

## समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही

# श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांचे आशिवर्चन

# माजलगाव मठात गुरूपौर्णिमेला उसळली भक्तांची गर्दी

**माजलगाव । प्रतिनिधी**

कोणत्याही समाजाची प्रगती शैक्षणिक गुणवत्तेवर ठरत असते. जीवनात सर्वांगिण प्रगती करावयाची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. त्यामुळे समाजातील मुलामुलींनी शिक्षणाकडे आपले अधिक लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन श्री सद्गुरू मिस्किन स्वामी मठ संस्थानचे मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी आपल्या आशिवर्चनात केले, ते गुरूपौर्णिमा उत्सवानिमित्त कार्यक्रमात बोलत होते. दरम्यान, या उत्सवाला अक्षरशः भक्तांची गर्दी उसळली होती.गुरूपौर्णिमा उत्सव सोहळ्यात समाजातील गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थीनींना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. माजलगाव मठात गुरूपौर्णिमा उत्सव विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल होती. यावेळी भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजलगाव मठाचा सर्वदूर लौकिक आहे. तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांनी जो आदर्श वसा आणि वारसा घालू दिला आहे. तो तत्परतेने पूर्ण करण्यास आपण बांधील आहोत, असे प्रतिपादन सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी मठ संस्थानचे विद्यमान मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी केले. गुरूंना भक्तांची निस्सीम भक्ती अपेक्षित असते. गुरूंची भक्ती मनोभावे करावी असे, आवाहन करत उपस्थित भक्तगणांना गुरूपौर्णिमेचे महत्व विषद केले. गुरूपौर्णिमेनिमित्त माजलगाव येथील श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठात विविध धार्मिक कार्यक्रम झाले. यात प्रामुख्याने इयत्ता दहावी आणि बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान केली.

या गुरूपौर्णिमा उत्सव सोहळ्यास समाज बांधवांना मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी आशीर्वचनपर भाषणातून मार्गदर्शन केले. पुढे बोलताना श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज म्हणाले, माजलगाव येथील सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठातर्फे दरवर्षी वीरशैव लिंगायत समाजातील गरजू व गुणवंत ३८ विद्यार्थी-विद्यार्थ्यांनींना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. यावेळी वैदिक पाठशाळेचे अध्यापक शिवप्रसाद स्वामी (शास्त्री), किरण स्वामी यांच्यासह सहभागी शिबिरार्थींचा यथोचित सन्मान झाला. लिंगैक्य तपोरत्नं प्रभूपंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांनी समाजाच्या हितासाठी शिष्यवृत्ती योजना सुरू केली. तो वसा आणि वारसा आम्ही समर्थपणे पुढे चालवू शिक्षण हे जीवनात अमुलाग्र बदल घडविणारे माध्यम आहे. त्यामुळे गुणवंत विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात प्रगती करून जीवनाचे सोने करावे, असे भावनिक आवाहनही श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी केले. गुरूपौर्णिमेनिमित्त माजलगाव येथील सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठात विविध धार्मिक विधी पार पडल्या. समाजबांधवांकडून सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संजीवन समाधीस रूद्राभिषेक, लिंगैक्य तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या समाधीस अभिषेक, श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांची पाद्यपूजा करण्यात आली. दरम्यान, या गुरूपौर्णिमा उत्सव सोहळ्याला महाराष्ट्रासह कर्नाटक राज्यातुनही भक्तगणांनी हजेरी लावली होती. दरम्यान, उल्लेखनीय कार्याबद्दल तुकाराम येवले, उमेश मोगरेकर, बाबा देशमाने, आनंद डोंगरे, बालासाहेब फपाळ पाटील, भगीरथ तोडकरी यांचा सन्मान करण्यात आला.



# युवती व महिलांसाठी पं.उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोज

**बीड (प्रतिनिधी):** बीड जिल्हयातील बेरोजगार महिला उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी याकरिता कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र, बीड मार्फत दिनांक ११ जुलै २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी ०२ यावेळेत शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था,(मुलींचे)चंपावती शाळेच्या पाठीमागे,नगर रोड,बीड येथे पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. सदर मेळाव्यामध्ये पुढिलप्रमाणे नांमाकित कंपनी/आस्थापना च्या वतीने बेरोजगार महिला उमेदवारांना रोजगाराची संधी मिळावी याकरिता प्रत्यक्ष् मुलाखती घेण्यात येणार आहेत.

गुरुकुल इंगलिश स्कुल बीड, येथे प्रा.शिक्षक एकूण पदे-०५ शैक्षणिक पात्रता- डी.एड./बी.एड (इंग्रजी) वयोमर्यादा-२५ ते ३५ जॉब लोकेशन बीड,एल आय सी बीड, येथे विमा सखी एकूण पदे २० शैक्षणिक पात्रता- १० वी किंवा १२ वी वयोमर्यादा-१८ ते ४५ जॉब लोकेशन-बीड,समर्थ नर्सिग स्कुल, बीड येथे टयुटर, एकुण पदे-०४ शैक्षणिक पात्रता- बी.एस.सी नर्सिग वयोमर्यादा १८ ते ३० जॉब लोकेशन- बीड,.एस.जी.सॉप्टवेअर सोल्युशन, बीड येथे ऑफिस मॅनेजर, एकुण पदे-०४ शैक्षणिक पात्रता-१२ वी/पदवी वयोमर्यादा १८ते ३० जॉब लोकेशन- बीड,५.टाटा लाईफ इंन्श्अरंस बीड येथे लीडर न्ड डव्हायजर एकुण पदे-२५ शैक्षणिक पात्रता-१० वी किंवा १२ वी जॉब लोकेशन- बीड दि ११ जुलै रोजी शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था,(मुलींचे)चंपावती शाळेच्या पाठीमागे,नगर रोड,बीड येथे प्रत्यक्ष येऊन संधीचा लाभ घ्यावा. रोजगार मेळाव्यास येताना आवश्यक कागदपत्रे सोबत आणावी. या बाबत काही अडचणी असल्यास श्री. जयदत्त इंगोले यांना ९८२२७८१८७६ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा तसेच इशशव ड्ढ्ढळश्रश्र या फेसबुक पेजला फॉलो व लाईक करावे असे आवाहन श्री. सुशिल उचले, सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र, बीड यांनी केले आहे.

# सोनिजवळा येथे आषाढी एकादशी निमित्त केळी व चहाचे वाटप

**केज (प्रतिनिधी):** केज तालुक्यातील सोनिजवळा येथे आषाढी एकादशी निमित्त भावीक भक्तांना रमेशराव आडसकर मित्र मंडळाच्या वतीने गावातील भाविकांना केळी व चहा वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



याबाबत सविस्तर वृत्त असे की केज तालुक्यातील सोनिजवळा येथे प्रती वर्षा प्रेमाने याही वर्षी रमेशराव आडसकर मित्र मंडळाच्या वतीने गावातील भाविकांना केळी व चहा वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, पंढरपूर येथील पांडुरंगाच्या दर्शनासाठी प्रत्येकाला वाटते तिथे जाऊन दर्शन घ्यावे परंतु कांहीची ईच्छा आसुन देखील परीस्थिती मुळे शक्य होत नाही.देव हा माणसातच आहे एकमेकांना समजून घेऊन अडचणीच्या वेळी मदत करणे कोणताही भेदभाव न करता जीवन एकदा आहे त्यामुळे देव हा आपल्या मध्येच आहे आपल्याला पंढरपुरला जाऊन दर्शन जरी घेता आले नाही तरी चालेले परंतु जो अडचणीत आहे जो भुकेला आहे तहानलेला त्याला सहकार्य करा त्यातच विठ्ठल भेटेल आसे यावेळी अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक तथा ग्रामपंचायत सदस्य मिनाज पटेल यांनी बोलताना सांगितले या कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत सदस्य देवीदास जोगदंड यांनी केले होते.

# धोंडराई जि.प.शाळेत गुणवंतांचा सत्कार व वाचनालयाचे उद्घाटन

**गेवराई (प्रतिनिधी):** -इयत्ता दहावी, एन.एम.एम.एस. तसेच शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आणि सावित्रीमाई फुले अभ्यासिकेचे उद्घाटन धोंडराई येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत मान्यवरांचे उपस्थितीत संपन्न झाले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून गेवराई येथील र.भ.अट्टल महाविद्यालयातील मराठी विषयाचे प्राध्यापक डॉ.समाधान इंगळे उपस्थित होते. तर शिक्षण प्रेमी नागरिक दिलीपराव नागरगोजे, शालेय समितीचे अध्यक्ष रामेश्वरजी पानखडे, उपाध्यक्ष इलियास काजी, एल.एल.चव्हाण यांची यावेळी उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक गणेश शहाणे हे होते. याप्रसंगी इयत्ता १० वी मध्ये गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांसह सन्मानित करण्यात आले. ज्यामध्ये अनुक्रमे आरती बळीराम ठोंबरे, साधना भगवान जाधव व साक्षी राम जायगुडे यांचा समावेश आहे. रोख बक्षीस व गौरव चिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. प्रत्येक विषयात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचाही यावेळी रोख रक्कम देऊन गुणगौरव करण्यात आला.एन.एम.एम.एस. व ८ वी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी रोहन शेंडगे, रुद्र वंजारे, दिपक सातपुते, विजय मुंडे, काझी उजेर व गायत्री चोरमले यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. वाचन संस्कार रुजावा, विचारशक्ती प्रगल्भ व्हावी व



विद्यार्थी लिहिते व्हावे याकरिता सावित्रीमाई फुले अभ्यासिकेचे उपस्थित मान्यवर व गावकऱ्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

गुणवंतांनी सातत्य कायम ठेवून आपले व समाजाचे भविष्य प्रकाशमान करावे. बहुआयामी व्यक्तिमत्त्व निर्माण होण्यासाठी विद्यार्थ्यांनी व्यासंग वाढविणे आवश्यक आहे. यातूनच भविष्यातील उत्तम लेखक, कवी, वक्ते, आदर्श नागरिक घडविण्यासाठी मदत होणार आहे. शाळेच्या माध्यमातून चालविली जाणारी अभ्यासिका महत्वपूर्ण योगदान देणार आहे. यासाठी शाळेचे प्रयत्न अभिनंदनीय व दिशादर्शक आहेत असे मत डॉ.समाधान इंगळे यांनी व्यक्त केले.पुढे बोलताना ते म्हणाले की, जिल्हा परिषद शाळा या गुणवतांची खाण असतात. माझ्या समोरील सर्व आदर्श माणसे जिल्हा परिषदेच्या शाळेतूनच घडलेली आहेत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.नितीन माळी यांनी केले, तर प्रास्ताविक व्ही.एम.जाधव यांनी केले. जे.एन.जाधव यांनी आभार मानले. या गौरव सोहळ्यातील रोख बक्षिसे वर्ग शिक्षकांनी व शिक्षणप्रेमी गांवकरी दिलीपराव नागरगोजे यांच्यावतीने देण्यात आली.

# पिंपळवाडी हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांना गणवेश वाटप



**बीड (प्रतिनिधी):** दि.८ जुलै रोजी पिंपळवाडी हायस्कूल मध्ये कै. अ‍ॅड. भारतराव साहेबराव शिंदे यांच्या स्मरणात डॉ. पुनम शिंदे मॅडम यांनी पाचवीच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे कर्तव्यदक्ष , उपक्रमशील मुख्याध्यापक श्री प्रदीप जगताप सर हे होते प्रथम सावित्रीबाई फुले आणि विद्येची देवता सरस्वतीदेवीचे कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा मुख्याध्यापक श्री जगताप प्रदीप सर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच सर्व शिक्षकांनी प्रतिमेचे अभिवादन केले. शाळेचे मुख्याध्यापक प्रदीप जगताप सर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले त्यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री चौधरी सर यांनी केले. तसेच श्री. गाडेकर सरांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री देशमाने सर आणि ढगे सर यांनी केले कार्यक्रमाचे आभार श्री भरणे सर यांनी मानले या कार्यक्रमाला सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मोठ्या उत्साहाने सहकार्य केले तसेच या कार्यक्रमाला सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## राजेश सरकटे यांच्या गजराने न्हावून निघाले विठ्ठल भक्त

# गजर विठ्ठलाचा’ कार्यक्रमाला शहरवासीयांचा प्रचंड प्रतिसाद





**मंठा । प्रतीनिधी**

मातोश्री हंसादेवी सरकटे सांस्कृतिक, सामाजिक प्रतिष्ठान आयोजित प्रा. राजेश सरकटे यांची निर्मित असलेला गजर विठ्ठलाचा आषाढी महोत्सव संत एकनाथ मंदिरात रविवारी (ता. सहा) पार पडला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा. राजेश सरकटे यांनी पहाडी आवाजात सादर केलेल्या जय जय राम कृष्ण हरी आणि माझे माहेर पंढरी या भक्तिगीतांत भाविक तल्लीन झाले. रंगमंदिरात अक्षरशः टाळ्यांचा पाऊस पडला.नितीन सरकटे यांनी गायलेल्या चंद्रभागेच्या तिरी... अंजनीच्या सुता तुला रामाचं वरदान या भक्तिगीतात श्रोते न्हाऊन निघाले तर पायल सरकटे यांनी सादर केलेल्या सुंदर ते ध्यान उभे विटेवरी, बोलावा विठ्ठल या कठीण सुरवटीच्या अभंगाने भाविक मंत्रमुग्ध झाले होते.रसिकांनी अनेक गीतांना वन्समोअरची मागणी केली. अनेक गीतांनी अक्षरशः पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात असल्याची भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केली. कार्यक्रमादरम्यान संत एकनाथ नाट्यमंदिर हाऊस फुल्ल भरले होते तर रंगमंदिराच्या बाहेर ही अनेक रसिक उपस्थित होते कॅरीडोर मध्ये स्क्रीनवर सुद्धा अनेक रसिकांनी कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. विशेष म्हणजे शहरात नेमका कार्यक्रमादरम्यान पाऊस सुरू असतानाही भाविकांनी कार्यक्रमाला एवढी गर्दी केली हे विशेष. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.रवींद्र मगर यांनी केले तर विविध वाद्यांवर अंकुश बोर्डे, विजेंद्र मीमरोट, रवींद्र प्रधान, विजय खंडागळे, मास्टर सिद्धांत व्यवहारे, कृष्णा चेन्ने, बाबा खंडागळे अमित निर्मल यांनी सुंदर साथ संगत केली तर मुंबई येथील प्रसिद्ध सारंगी वादक संगीत कुमार मिश्रा व प्रसिद्ध बासरी वादक प्रथमेश साळुंखे यांनी रसिकांचे विशेष लक्ष वेधले. कार्यक्रमाला ध्वनी व्यवस्था संदीप यांची होती तर लाईट्स आणि नेपथ्य वाल्मीक जाधव यांनी केले, सुंदर स्क्रीनची आणि लाईव्ह प्रक्षेपणाची व्यवस्था उमेश तुरकणे यांनी केली. राजू परदेशी यांनी रंगमंदिर व्यवस्था बघितली संपूर्ण कार्यक्रमाचे व्यवस्थापन संजय सरकटे व विनोद सरकटे यांनी केले. कार्यक्रमाला खासदार संदीपान भुमरे, माजी मंत्री डॉ. भागवत कराड, आमदार विक्रम काळे, पंचायत राज अध्यक्ष आमदार संतोष दानवे, आमदार संजना जाधव, माजी मंत्री राजेश टोपे, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, ग्रामीण पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, सिडको प्रशासक जगदीश मिनियार, उद्योगजक मानसिंग पवार, माजी महापौर नंदकुमार घोडेले, भारतीय जनता पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, डॉ. उन्मेष टाकळकर, राजू शिंदे, जय बाबाजी भक्त परिवारचे राजेंद्र पवार, गणपत म्हस्के, नवनाथ बोडखे, राजीव राजोरे, रमेश मुळे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

# भाजपच्या राज्य परिषद सदस्य पदी सतीश मुंडे यांची नियुक्ती

## मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांचे सतीश मुंडे यांनी मानले आभार

## सतीश मुंडे यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत व अभिनंदनाचा वर्षाव

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन, दुग्धविकास मंत्री ना.पंकजाताई मुंडे व माजी खा.प्रितमताई मुंडे यांचे विश्वासू भाजपाचे माजी परळी तालुकाध्यक्ष सतीश मुंडे यांची भारतीय जनता पार्टी राज्य परिषद सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री ना.पंकजाताई मुंडे व मा. खा. डॉ.प्रितमताई मुंडे यांचे सतीश मुंडे यांनी आभार मानले आहेत. दरम्यान मंत्री पंकजाताई मुंडे व मा. खा. डॉ.प्रितमताई मुंडे यांनी आपल्यावर जो विश्वास टाकला आहे तो सार्थ करून दाखवू असे प्रतिपादन नवनियुक्त सदस्य सतीश मुंडे यांनी केले.

परळी वैजनाथ भारतीय जनता पक्षाचे माजी तालुकाध्यक्ष, पंचायत समितीचे माजी सदस्य,भारतीय जनता पक्षाच्या संघटन वाढीसाठी योगदान देणारे अशी ओळख असलेले सतीश मुंडे यांची भारतीय जनता पार्टी राज्य परिषद सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, सतीश मुंडे हे लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यापासुन निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. अनेक वर्षांपासून भाजपाचे सक्रिय कार्यकर्ते आहेत. जिल्ह्यात दांडगा संपर्क असुन जनसामान्य कार्यकर्तेसोबत घेऊन चालणारे , पक्षनिष्ठा असलेले वसंघटनात्मक वाढीसाठी कठोर परिश्रम घेणारे तसेच सर्वसामान्य कुटुंबात जन्म घेऊन असामान्य कर्तृत्व निर्माण व सिद्ध करण्याची जी कला प्रत्येकाला अवगत नसते पण ती कला यांनी कमी वेळेमध्ये अवगत केली, सामाजिक, धार्मिक, राजकीय, कार्यामध्ये हिरीरीने सहभाग नोंदवत आपल्या कार्याची चुणूक दाखवून त्यांनी अनेक उपक्रम यशस्वी करून दाखवले आहेत. तालुकाअध्यक्ष या पदावर असतांना



परळी तालुक्यात गाव तिथे भाजप व घर तिथे भाजपचा कार्यकर्ता या पद्धतीने काम करत चांगले योगदान देत काम केले आहे. भाजपमध्ये विविध पदांची जबाबदारी सक्षमपणे पारपाडली आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकीत प्रचारात आघाडीवर योगदान दिले आहे. गेल्या पाच वर्षात तालुकाध्यक्षपद सक्षमपने संभाळले आहे. अनेक अडचणी च्या काळातही त्यांनी आपली भूमिका चोख पणे संभाळली आहे. पंकजाताई मुंडे व डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी पक्षाचे शहर तसेच ग्रामीण भागात सचोटीने पक्षवाढीसाठी प्रयत्न केले. भाजप पक्षाची विचारधारा प्रत्येकाच्या घराघरात पोचविण्याचे काम केले. पंकजाताई मुंडे व डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या कार्यप्रणाली वर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टी बळकट करण्यासाठी प्रयत्न केला. त्यांच्या याच पक्षनिष्ठेची पावतीच म्हणून व त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन सतीश मुंडे यांची भारतीय जनता पार्टी राज्य परिषद सदस्यपदी नियुक्ती केली आहे. तसेच सतिश मुंडे हे ना.पंकजाताई मुंडे व मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांचे अत्यंत विश्वासू असून या पुर्वी पंचायत समिती सदस्य म्हणून त्यांनी काम पाहीलेले आहे. परळी तालुका समन्वय व पुनर्विलोकन समितीचेही ते अध्यक्ष होते. सतीश मुंडे यांची भारतीय जनता पार्टी राज्य परिषद सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल परळी वैजनाथसह बीड जिल्ह्यातुन राजकिय , सामाजिक, शैक्षणिक तसेच सर्वच क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या वतीने अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ना.पंकजाताई आणि मा.खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांनी भाजपच्या राज्य परिषद सदस्यपदी निवड करून माझ्यावर खुप मोठा विश्वास टाकला आहे. त्यांचा विश्वास सार्थ करून दाखवून भाजपाचे काम वाढविणार असल्याचे सांगून त्यांनी टाकलेला विश्वास सार्थ करून दाखवू असे प्रतिपादन सतीश मुंडे यांनी केले.भाजपच्या राज्य परिषद सदस्यपदी सतीश मुंडे यांची नियुक्तीबद्दल परळी मतदारसंघातील प्रत्येक गावात या निवडीचे स्वागत करण्यात आले.

# गुरू म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे नेणारा दीपस्तंभ–जनाई महाराज कोकाटे

## न्यू हायस्कूलमध्ये गुरुपौर्णिमेनिमित्त प्रभावी व्याख्यान

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

गुरुपौर्णिमेनिमित्त न्यू हायस्कूल शाळेत आज एक आगळावेगळा अध्यात्मिक व प्रेरणादायी कार्यक्रम पार पडला. व्यासपीठावर न्यू हायस्कूल शाळेचे मुख्याध्यापक मोरे सर, पर्यवेक्षक छाया मॅडम,नवीन प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक डी. जी. शिंदे सर पर्यवेक्षक उमेश देशमुख सर, ह भ प रामेश्वर महाराज कोकाटे ,जेष्ठ शिक्षक बाबासाहेब मुंडे सर, सुरवसे सर,राहुल ताटे सर यांच्यासह शिक्षक शिक्षिका उपस्थित होते.

महाराष्ट्रभर कीर्तनकार म्हणून परिचित आणि शाळेचीच विद्यार्थिनी असलेल्या ह.भ.प. जनाई महाराज कोकाटे यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाने संपूर्ण परिसर भारावून गेला. गुरू म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे नेणारा दीपस्तंभ आहे. जो आयुष्यभर आपल्या शिष्याला योग्य मार्ग दाखवतो. गुरुशिवाय



जीवन अधुरं असतं, असे प्रसिद्ध बाल कीर्तनकार हभप जनाई महाराज म्हणाल्या. त्यांनी गुरु–शिष्य परंपरेचे महत्व, आई–वडीलांचे संस्कार, व धार्मिक मूल्यांची जोपासना या विषयांवर ओघवत्या शैलीत प्रभावी विचार मांडले. त्यांच्या व्याख्यानात त्यांनी म्हटलं – गुरू आपल्याला ज्ञान देतात, पण त्याहूनही अधिक – ते आपल्याला जीवन जगण्याची कला शिकवतात. शिष्याने गुरुंसाठी केवळ आदर नाही, तर कृतीतून कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे असे सांगितले.

कार्यक्रमादरम्यान शाळेतील विद्यार्थ्यांची उत्सुकता व प्रेरणा विशेष लक्षवेधी होती. इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनी प्राजक्ता ढोबळे हिने सांगितले, आज पहिल्यांदाच गुरुपौर्णिमा साजरी करताना इतका अर्थपूर्ण अनुभव मिळाला. जनाईताईंचं बोलणं मनाला भिडलं असे सांगितले.शाळेचे मुख्याध्यापक श्री.मोरे सर म्हणाले कि, आपल्याच शाळेतील विद्यार्थिनी हभप जनाई महाराज संपूर्ण महाराष्ट्रात समाजप्रबोधन करत आहे, याचा सार्थ अभिमान आहे. आजच्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळाली असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन शिक्षकवृंद आणि व्यवस्थापनाच्या संयुक्त पुढाकारातून अतिशय नेटकेपणाने करण्यात आले होते. पुष्पगुच्छ, फलकसजावट, गुरूपूजन अशा पारंपरिक आणि सौंदर्यपूर्ण पद्धतीने गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. हा कार्यक्रम म्हणजे विद्यार्थ्यांसाठी केवळ व्याख्यान नव्हते, तर गुरूप्रती आदरभाव आणि आत्मिक प्रेरणा देणारा अनुभव होता. कार्यक्रमाचे सूत्र संचालन शास्त्री सर यांनी केले तर आभार प्रदर्शन मुंडे सर यांनी केले.

# उपमुख्यमंत्री अजित पवार व धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा संकल्प सप्ताहाचे आयोजन

**परळी (प्रतिनिधी):** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस परळीच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचा सेवा संकल्प सप्ताह १५ ते २२ जुलै २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके व शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी यांनी दिली आहे.१५ जुलै २०२५ रोजी सकाळी ६ वा. योगासन स्पर्धा, सकाळी १०:०० वा सेवा संकल्प सप्ताह उदघाटन व धनंजय मुंडे यांचा अभिष्टचिंतन सोहळा सकाळी ११ वा. मृदंग स्पर्धा,,सायं ७:०० ते १०:०० वा .भावरत्न गुरुदास ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांचे कीर्तन १६ जुलै २०२५ रोजीयुवा पिढीसाठी सामाजिक भान जपणारे मनोरंजनात्मक व्यासपीठ–रिल्स स्पर्धा ,१७ जुलै २०२५: महिलांसाठी भजन स्पर्धा १८ जुलै २०२५:शालेय सांस्कृतिक महोत्सव (शहर)१९ जुलै २०२५:शालेय सांस्कृतिक महोत्सव (ग्रामीण) विद्यार्थ्यांसाठी विशेष संधी.२० जुलै २०२५; आरोग्य शिबीर सर्वांसाठी आरोग्य तपासणी व मार्गदर्शन२१ जुलै २०२५ सामान्य ज्ञान ,२२ जुलै २०२५ ना. अजितदादा पवार यांचा अभिष्टचिंतन (सकाळी १०:३० वा.) परळी तालुक्यातील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा, शालेय साहित्य वाटप व बक्षिस वितरण सोहळा होणार आहे . तसेच प्रसिद्ध व्याख्याते महेश पाटील सर यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान होणार आहे.तसेच या सेवा संकल्प सप्ताहात ८ दिवस, दररोज विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्येआरोग्य तपासणी,मोफत रक्तदाब व मधुमेह तपासणी शिबीर, एपीएल फॉर्मस् डीबीटी योजना व शिधापत्रिका ऑनलाइन करुन देणे, घरकुल व विविध शासकीय योजना तक्रार निवारण,पर्यावरण संवर्धनासाठी एक अनोखा उपक्रम प्रत्येक नागरिकाला एक वृक्ष भेट!आधार कार्ड दाखवा व वृक्ष घेऊन जा उपक्रम,संजय गांधी निराधार योजना लाभार्थी यांचे आधार सिडीग, जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी, डोमिसाईल आदी कागदपत्र एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यासाठी विद्यार्थी विविध प्रमाणपत्र कॅम्प,बांधकाम कामगार नोंदणी अभियान: नवीन नोंदणी व नूतनीकरणासाठी विशेष सोय,पक्षाशी जोडून घेण्यासाठी सुवर्णसंधी: राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सदस्य नोंदणी अभियान आदी कार्यक्रम, उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

# अखिल भारतीय लघु व मध्यम वृत्तपत्र संघाच्या जिल्हा सरचिटणीसपदी बालाजी जगतकरच्या निवडीबद्दल सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय लघु व मध्यम वृत्तपत्र संघाचे मराठवाडा अध्यक्ष आत्मलिंग शेटे यांच्या हस्ते बीड जिल्ह्यातील कार्यकारणीत बालाजी जगतकर यांची सरचिटणीसपदी निवड केली आहे. देशपातळीवर व राज्यपातळीवर प्रकारासाठी ही संघटना काम करते. बीड जिल्ह्यात बालाजी जगतकर हे अनेक वर्षापासून पत्रकार व संपादक म्हणून काम करत आहेत. जिल्ह्यात संघटन अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने ही निवड





गुरुपौर्णिमेच्या दिवशी करण्यात आली आहे. उर्वरित जिल्हाकारणी आठवड्यात लवकरच बैठक येणार असल्याची माहिती आत्मलिंग शेटे यांनी सतरा वेळी बोलताना सांगितले आहे. या निवडीच्या सत्काराला संपादक मोहन वावळे, संतोष जुजगर,अनिल गायकवाड,राज जगतकर रावसाहेब आदी उपस्थित होते.

# चार वर्षाच्या लहान मुलीसह चोवीस वर्षीय विवाहित महिला बेपत्ता

**केज । गौतम बचुटे**

केज येथून एक चार वर्षाच्या मुलीसह चोवीस वर्षीय विवाहित महिला बेपत्ता झाली आहे.या बाबतची माहिती अशी की, सहा वर्षापूर्वी अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड येथील एका तरुणाशी लग्न झालेली चोवीस वर्षीय विवाहित महिला ही नवऱ्याशी पटत नसल्याने ती तिच्या चार वर्षाच्या मुलीसह एक वर्षा पासून आई–वडिलांकडे केज शहरात राहात आहे. दि. ९ जुलै रोजी ती विवाहित महिला ही केजच्या बस स्टँड परिसरात असलेल्या हॉटेलमध्ये मुलीला दूध पाजण्यासाठी म्हणून गेली ती परत आलीच नाही. नातेवाईकांनी तिचा शोध घेतला असता ती आढळून आली नाही. म्हणून त्या बेपत्ता असलेल्या विवाहित महिलेच्या आईच्या तक्रारी वरून ती व तिची मुलगी बेपत्ता असल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे.सदर बेपत्ता विवाहित महिला व तिची मुलगी यांच्या विषयी कुणाला माहिती असल्यास केज पोलीस आणि हेडकॉन्स्टेबल मुंडे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# वाळवंटात जसे ओसिस तसे ऐन सिमेंटच्या हायवेवर फुलले सूर्यफूल

**केज । गौतम बचुटे**

वाळवंटात जसे पाण्याचा आभास निर्माण करणारे ओसिस दिसल्यास पाणी असल्याचा आभास निर्माण होतो. तसाच केज शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या जवळील महामार्गावर असलेल्या दुभाजकावर सूर्यफूल उमलले असून येणारे जाणारे प्रवाशी मात्र या सिमेंट रोडवर फुललेल्या सूर्यफुलाकडे कुतुहलाने पाहात आहेत.तसेच या सूर्यफुलाच्या पाठीमागील बाजूस छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य असा अश्वारूढ पुतळा असल्याने सौंदर्य खुलून दिसत आहे.



# शासनाच्या निर्णयाविरुद्ध आलोपॅथी डॉक्टर्स एकवटले

**कळंब । प्रतिनिधी**

शासनाने दि ३० जून २०२५ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार सर्टिफिकेट कोर्स करणा–या होमीओपॅथी डॉक्टरांना एम बी बी एस डॉक्टरांचा दर्जा बहाल केला जाणार आहे. यामुळे वैद्यकीय क्षेत्राचे पावित्र्य राखले जाणार नाही आणि दर्जेदार आरोग्य सेवा मिळणे कठीण होणार आहे. कामचलाऊ झोलाछाप व हायब्रीड डॉक्टर्स निर्माण होणार असून ते आम जनतेच्या आरोग्याशी खिलवाड करणार आहेत. यामुळे आम जनतेचे आरोग्य धोक्यात येणार आहे.

याला आळा घालण्यासाठी शासनाने नुकतेच काढलेले परिपत्रक त्वरित रद्द करून आरोग्य सेवेचे पावित्र्य राखले जावे यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशन ने सूचीबद्ध आंदोलन करण्याची दिशा रविवार दि ६ जुलै २०२५ रोजी मुंबई येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय बैठकीत जाहीर केली. यामध्ये लोकप्रतिनिधींना भेटून आपल्या समस्या त्यांच्या कानावर घालणे, चालू अधिवेशनात विरोधीपक्ष आमदारामार्फत औचित्याचा मुद्दा अथवा तारांकित प्रश्नाद्वारे विषयाला वाचा फोडणे. तसेच मंगळवार दि ८ जुलै रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी/ तहसीलदारांना मागण्याचे निवेदन देऊन शासनाचा जाहीर निषेध करणे. आज दि ८ जूलै रोजी तहसीलदार श्री हेमंत ढोकळे साहेब यांना नायब तहसीलदार श्री गोकुळ भराडिया यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले. जर शासनाने काही कार्यवाही केली नाही तर शुक्रवार दि ११ जुलै रोजी संपूर्ण महाराष्ट्रातील खाजगी इस्पितळे, दवाखाने, नर्सिंग होम, क्लिनिक्स एक दिवस बंद ठेवली जाणार आहेत. यामुळे पेशंटच्या होण–या गैरसोयी बद्दल आय एम ए ने दिलगिरी व्यक्त केली आहे.

याला शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला नाही तर शनिवार दि १९ जुलै रोजी मुंबई येथे लाँग मार्च काढून आझाद मैदानावर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. यानंतर ही जर शासनाने आडमुठे धोरण बदलले नाही तर सर्व डॉक्टर्स आपापले लायसन्स व दवाखाना परवाने सामुदायिक रित्या शासनाकडे परत करून बेमुदत आरोग्य सेवा बंद ठेवणार आहेत. यामुळे उदभवणाऱ्या आरोग्य समस्या, कायदा व सुव्यवस्था बिघडल्यास शासन जबाबदार राहील असे त्यांच्या प्रशिद्दी पत्रकात म्हटले आहे.

पत्रकावर महाराष्ट्र राज्य सल्लागार समिति सदस्य डॉ रामकृष्ण लोंढे, कळंब शाखाध्यक्ष डॉ शितल कुंकुलोळ, सचिव डॉ सत्यप्रेम वारे, कोषाध्यक्ष डॉ शिल्पा ढेंगळे, स्त्री रोग जिल्हा उपाध्यक्ष डॉ वर्षा कस्तुरकर, डॉ शोभा पाटील, फीजीशियन संघाचे डॉ नीतीश गावडे, डॉ महादेव कोरसळे, बालरोग संघटनेचे जिल्हा सहसचिव डॉ अभिजित लोंढे, डॉ शाम चौधरी, सोनोग्राफी संघाचे डॉ महेश रपकाळ, डॉ अनुराधा हुंबे,पॅथॉलॉजी चे डॉ कमलाकर गायकवाड, आर्थोचे डॉ अजित देशमुख, ऑपथॉलमचे डॉ अभिजित जाधवर , भूलतज्ज्ञ संघाचे डॉ प्रियंका आलाट ई च्या स्वाक्षऱ्या आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077